# मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग
जा.क्र.मनपा/आस्था/ ३६८ /२०१७
दि.१५/६/२०१७

**निवडणूक कामकाज केलेले वर्ग-०१ व वर्ग-०२ संवर्गातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची ठोक मानधन तत्वावर सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.**

## ।। जाहीर सुचना ।।

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे मिरा भाईंदर महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक-२०१७, माहे ऑगस्ट-२०१७ मध्ये होणार आहे. या निवडणूकीच्या अनुषंगाने मुख्य कार्यालयात आवश्यकतेप्रमाणे निवडणूक विषयक कामकाज करणेसाठी, निवडणूक विषय कामाचा अनुभव असलेले वर्ग-०१ संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी तसेच वर्ग-०२ संवर्गातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची ठोक मानधन तत्वावर सेवा उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. सदर पदासाठी इच्छूक असलेल्या तसेच अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवाराकडून खालील अटी व शर्तीवर दि. २१ /०६/२०१७ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत आवक-जावक विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, तळ मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) येथे टपालाद्वारे किंवा स्वहस्ते अर्ज स्विकारण्यात येतील. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जांचे लखोटे उघडण्यात येणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकीटावर "वर्ग-०१ व वर्ग-०२ संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी" पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

उपलब्ध पद संख्या -

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | विवक्षित कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | वर्ग-०१ संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी (सेवा करार पद्धतीने) | ०१ | १) मिरा भाईंदर महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक-२०१७, माहे ऑगस्ट-२०१७ मधील निवडणूक विषयक कामकाज करणे.<br>२) निवडणूक विषयक कामाचा कमीत कमी ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २. | वर्ग-०२ संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी (सेवा करार पद्धतीने) | ०२ | |

अटी व शर्ती :-

१) उमेदवार शासकीय कार्यालय/शासनाचे उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था यातून सेवानिवृत्त झालेला असावा.

२) सेवा निवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची विहीत कार्यपद्धीतीचे पालन करुन करार पद्धतीने नेमणूक करतांना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे. अशा पारिश्रमिक रक्कमांची कमाल मर्यादा मासिक रु. ४०,०००/- (रु. चाळीस हजार.) इतक्या मर्यादेत असावी.

३) उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ही ७० वर्षापेक्षा अधिक नसावी.

४) सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ०६ महिन्यांसाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नूतनीकरण करता येईल. परंतु एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

५) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने सदर काम पुर्ण करण्यास जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व तसे हमी पत्र/बंध पत्र घेण्यात येईल.

६) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्यबाबतचा अधिकार/हक्क नसेल.

निवड प्रक्रिया :-

- प्रशासकीय किंवा अन्य .कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका